# FIRST INFORMATION REPORT

पहिली खबर

Form : 1-A

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

No. 0025014

1. * Dist. / जिल्हा: भंडारा * P.S. / पोलीस ठाणे: लाखनी *Year / वर्ष: २०१९ *FIR No. / पहिली खबर क्र.: ३८०/१९ Date / तारीख: ०५/१२/२०१९

2. (i) *Act / अधिनियम: लो.प्र.का. सन १९८८ *Sections / कलमे: ७, १२.

(ii) *Act / अधिनियम: (सुधारीत अधिनियम २०१८) *Sections / कलमे: —

(iii) *Act / अधिनियम: — *Sections / कलमे: —

(iv) *Other Acts & Sections / इतर अधिनियम व कलमे: —

3.(a) *Occurence of Offence : / अपराधाची घटना *Day / वार: गुरुवार *Date from / तारीख पासून: ०५/१२/२०१९ *Date To / तारीख पर्यंत: ०५/१२/२०१९

*Time Period / वेळेचा अवधी: दुपारी *Time From / पासून: १४.५१ *Time To / पर्यंत:

(b) Information received at P.S.Date / पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख: ०५/१२/२०१९ *Time / वेळ:

(c) General Diary Reference Entry No. (s) / सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक: ३५/१९ *Time / वेळ: १७.३२

4. Type of information / माहितीचा प्रकार: लाच व भ्रष्ट मार्गाने लाचेची मागणी करुन स्विकारणे. *Written / Oral : / लेखी/तोंडी: तोंडी.

5. Place of Occurrence : (a) * Direction and Distance from P.S. / घटनेचे ठिकाण ग्रामपंचायत पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर: उत्तर ३ कि.मी. Beat No. / गस्तक्षेत्र क्र.: लाखनी

(b) *Address: / पत्ता: ग्रामपंचायत कार्यालय लाखनी ता. लाखनी जि. भंडारा.

(c) *In case outside limit of this Police Station, then the / या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. / पोलीस ठाणे: Dist.: / जिल्हा:

6. Complainant /Informant : / तक्रारदार / खबरी

(a) Name / नाव: राजेश निंबेकर

(b) Father's/ Husband's Name / पित्याचे / पतीचे नाव: उध्दवराव निंबेकर.

(c) Date/Year of Birth : / जन्म तारीख / वर्ष: ४९ वर्ष (d) Nationality : / राष्ट्रीयत्व: भारतीय

(e) Passport No. : / पारपत्र क्र.: — Date of Issue : / दिल्याची तारीख: — Place of Issue / दिल्याचे ठिकाण: —

(f) Occupation : / व्यवसाय: व्यापवसाय.

(g) Address : / पत्ता: रा. लाखनी ता. लाखनी जि. भंडारा.

कॅम्प लाखणी

दिनांक:— ०५/१२/२०१९.

## फिर्याद

मी राजेश उध्दवराव निंबेकर,वय ४९ वर्ष, धंदा— सुपरवायजर रा. लाखनी ता. लाखनी जि. भंडारा.

मी दिनांक ३०/११/२०१९ रोजी पोलीस उप अधिक्षक श्री. महेश चाटे, सर ला. प्र. वि. भंडारा समक्ष एक लोकसेविकेविरूध्द लाच मागणी संबधाने तोंडी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तोंडी तक्रार खालील प्रमाणे आहे.

''मी स्वत: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर येवुन तक्रार देतो की, वरील नमुद पत्यावर राहतो आणि एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर यांचे कडे सुपरवायजर म्हणुन मागील एक वर्षा पासुन कामाला आहे.

एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर यांचे काम लाखनी नगर पंचायत अंतर्गत सुरू असुन त्या कामावर मी देखरेख करीत असतो. एस. आर. जयस्वाल यांचे कंपनीकडुन करण्यात आलेल्या कामाची बिले मंजुरीनंतर धनादेश श्री. एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर यांचे नावाने निघतात. मौजा लाखनी येथे सिमेंट रोड, नालीचे बांधकाम, त्यावरील झाकणे आणि खडीकरण इत्यादी कामाची निवीदा मंजुर होउन कामे पुर्ण झाली आहे. अंदाजे २ महीण्यापुर्वी खडीकरण कामाचे ४,६४,९२३ रूपयाचे बिल मंजुर होउन धनादेशाद्वारे ती रक्कम एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर यांचे खात्यावर जमा झाली. वरील नमुद बिल काढुन दिल्याचे मोबदल्यात एकुण बिलाच्या रकमेच्या तिन टक्के कमीशनची रक्कम १३,५००/— रूपये लाचेची मागणी गैरअर्जदार हयानी केली आहे.

एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर चे मालक श्री. शैलेश जयस्वाल यांचे मार्फतीने झालेल्या कामाचे बिल मंजुर करवुन घेवुन झालेल्या कामाची रक्कम एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर यांचे खात्यामध्ये जमा होईपर्यंतची ते बिल तयार करून घेणे आणि मंजुरीकरीता संबंधीत खात्याकडे सादर करणे आणि धनादेश काढणे ही जबाबदारी माझेकडेच असते. गैरअर्जदार या नगर पंचायत, लाखणी येथे अध्यक्ष या पदावर नेमणुकीस असल्याने त्यांची नोटशिटवर सही असल्याशिवाय तयार केलेले बिल मंजुरीकरीता पाठविण्यात येत नाही. गैरअर्जदार याचे कार्यालयात एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर यांचे प्रलंबित असलेले एकुण ७ बिल पेंडीग ठेवलेले आहेत. ते सर्व बिल मंजुर करून त्यांचे धनादेश काढण्याअगोदर वरील नमुद मंजुर बिलाची तिन टक्के कमिशनच्या १३,५००/— रूपयांची रकमेची लाच दिल्याशिवाय प्रलंबीत असलेले ०७ बिल काढणार नसल्याचे गैरअर्जदार यांनी स्पष्ट कळविलेले आहे. मी, दिनांक २५/११/२०१९ रोजी नगर पंचायत, लाखनी येथील प्रलंबित ०७ बिल मंजुर करणे आणि त्याचा धनादेश काढण्यासंबंधाने श्रीमती ज्योती निखाडे यांना विचारपुस केली असता त्या सिमेंट रोड आणि नाली बांधकामाचे बिल मंजुरी करीता या पुर्वी मंजुर करण्यात आलेल्या खडीकरण कामाच्या बिलाचे तिन टक्के कमीशनची १३,५००/— रूपयांची रक्कचेची लाच ते बिल काढुन दिल्याचे मोबदल्यात मागणी करून ती मोबदल्याची रक्कम दिल्यानंतरच उर्वरीत ०७ प्रलंबित बिलांचे धनादेश एस.आर.जसस्वाल कॉन्ट्रक्टर यांचे नावाने काढणार असल्याचे सांगीतले.

मला, गैरअर्जदार यांना तिन टक्के कमीशन रूपये १३,५००/—रूपये लाच म्हणुन देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी तकार करण्यास आलो आहे. माझे आणि गैरअर्जदार श्रीमती ज्योती निखाडे यांच्याशी पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही होणेकरीता तक्रार देत आहे.

पोलीस उपअधिक्षक श्री. चाटे, सर यांनी लाचेच्या संबंधाने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून घेवून त्यांना मी दिलेली तक्रार वाचण्याकरीता दिली व त्याचेवर सहया केल्या.

मला श्री. चाटे साहेबांनी गैरअर्जदार हे कुठे हजर मिळतील? याबाबत विचारले असता मी त्यांना सांगितले की, गैरअर्जदार यांचे कार्यालय बंद होण्याची वेळ झाली असुन, गै.अ. श्रीमती ज्योती निखाडे,



(राजेश। निंबेकर)

**Form : 1-B**

Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

No. 0025014

आरोपी क्र.१. सौ. ज्योती हेमराज निखाडे वय ३९ वर्ष पद- नगराध्यक्ष नगरपंचायत लाखनी (इसोले)
आरोपी क्र.२. (खाजगी इसम) श्री. हेमराज उर्फ राजू दयाराम निखाडे वय ५० वर्ष धंदा शेती
दोन्ही रा. प्रभाग क्र.१७ सेलोटी ~~रोड~~ लाखनी, जि. भंडारा.

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | *Date/Year of Birth जन्मतारीख/ वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| — | — | ——— | ——— | ——— | |

| *Deformities/Peculiarities व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit(s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| | ——— | ——— | ——— | | |

| * Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar व्रण | *Tattoo गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| | ——— | ——— | ——— | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.
A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.
A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

कार्यालयात हजर मिळणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांचे विरूध्दची पुढील सापळा पडताळणी कार्यवाही दिनांक ०२/१२/२०१९ रोजी आयोजित करण्याचे ठरविण्यात आले होते.

मला दिनांक ०२/१२/२०१९ रोजी महत्वाचे काम असल्याने पुढील पडताळणी कार्यवाही ही दिनांक ०४/१२/२०१९ रोजी आयोजित करण्याचे ठरविण्यात आले होते.

दिनांक ०४/१२/१९ रोजी मला आणि पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या. पडताळणी कार्यवाही करीता ला.प्र.वि. भंडारा येथुन सापळा अधिकारी, पंच, सापळा कार्यवाहीचे सदस्य हे शासकिय वाहणाने व मी माझे मित्राचे चारचाकी वाहनाने मौजा लाखनिच्या अलिकडील वाघाये राईस मिलच्या परिसरात गेलो. तेथुन पुन्हा पोलीस उपअधिक्षक चाटे सर यांनी पडताळणीच्या सुचना देवुन मला पंच क्र. १ सोबत गै.अ. यांना भेटण्यास नगर पंचायत लाखनी येथे माझे वाहणाने पाठविले. पडताळणी कार्यवाही दरम्यान **गै.अ. श्रीमती ज्योती निखाडे यांनी यापुर्वी काढुन दिलेल्या ४,६४९२३/–रूपयाचे धनादेशाचा मोबदला बिलाच्या रकमेच्या दोन टक्के प्रमाणे ९,०००/– रूपये लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली**. तसेच त्यांचे कक्षात हजर असलेले गै.अ. यांचे पती यांनी सुध्दा श्रीमती निखाडे यांना **"जावु दे आता यायचा एक वेळा"** असे म्हणुन दुजोरा दिला. मी नउ हजार रूपये आज नाहितर उदयाला आणुन देतो असे मी त्यांना म्हणालो, त्यावर गै.अ. श्रीमती निखाडे यांनी ठिक आहे असे म्हणुन गै.अ. यांनी लाच रक्कम **स्विकारण्याची** तयारी दर्शविली. मी पंचासह परत आल्यावर श्री. चाटे, सर यांनी व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी केली असल्याची शहानिशा केली. व आम्ही लाप्रवि भंडारा येथील कार्यालयात गेलो.

त्यानंतर मला लाच देण्यासाठी ९०००/–रूपये हजर करण्यास सांगितले असता मी दोन्ही पंचासमक्ष ९०००/–रूपये ज्यामध्ये ५००/–रूपये दराच्या १८ चलनी नोटा होत्या त्या हजर केल्या. त्यानंतर त्याचेवर निळया लाईटमध्ये चमकणारी पावडर लावून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सापळा अधिकारी चाटे साहेबांनी पुढील सापळा कार्यवाही दिनांक ०५/१२/२०१९ रोजी करण्याचे ठरविले. व मला तसेच दोन्ही पंचांना सुचना देवुन दिनांक ०५/१२/२०१९ रोजी लाप्रवि भंडारा कार्यालयात हजर होण्याचे सांगितले.

दिनांक ०५/१२/२०१९ रोजी मी ला.प्र.वि. कार्यालय भंडारा येथे हजर झालो. दोनही पंच हजर होते. मला तसेच दोन्ही पंच यांना सापळा कार्यवाही बाबत सुचना देवुन पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्यात आली. त्यानंतर सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री. चाटे साहेबांनी यांनी मौजा लाखणीच्या अलिकडील वाघाये राईस मिलच्या परिसरातुन पुढील सापळा कार्यवाही करण्यासाठी माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर लावून, पावडर लावलेल्या एकुण ९,०००/– रूपये ज्यात ५००/– रूपयाच्या १८ चलनी नोटाचा समावेश होता, त्या माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच क्र. १ श्री. मगर यांचे हस्ते ठेवुन सौ. ज्योती निखाडे व त्यांचे पती श्री. निखाडे यांचे कडे, नगर पंचायत लाखनी येथे पंच क्र. १ यांचेसह मी आणलेल्या चारचाकी वाहनाने पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ यांचे सह नगर पंचायत लाखनी येथे गेलो असता गै.अ. सौ. ज्योती निखाडे यांचे कक्षात लोकांची खुप गर्दी असल्याने आम्ही त्यांचे कक्षातच बसुन होतो. गै.अ. यांचे कक्षातुन लोक कक्षाबाहेर गेले. व त्यांचे कक्षात त्यांचे पती व निखाडे मॅडम बसुन होत्या. मी सौ. ज्योती निखाडे यांना म्हटले की, तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी ९०००/–रूपये घेवुन आलेलो आहे. त्यावर निखाडे मॅडम म्हणाल्या की, पुर्ण बिल काढुण देतो जैसवाल याला सांगुन पुर्ण पैशे आणुन द्या. असे म्हटले. त्यावर मी त्यांना म्हणालो की, सध्या तुम्ही सांगितलेप्रमाणे ९०००/–रूपये त्यांनी पाठविले आहेत बाकीचे उद्याला आणुन देतो असे म्हटले. त्यावर सौ. निखाडे मॅडम आपल्या पती कडे बोट दाखवुन म्हणाल्या की, यांचे कडे पैशे दया. नंतर मॅडम कक्षाबाहेर निघुन गेल्या. मी सौ. निखाडे मॅडम यांनी सांगितलेप्रमाणे लाचेची रक्कम ९,०००/–रूपये सौ. निखाडे यांचे पती श्री. हेमराज निखाडे यांना दिली. त्यांनी लाच रक्कम आपले डावे हाताने स्विकारून आपल्या पॅन्टच्या समोरील डावे बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर ठरल्याप्रमाणे श्री. चाटे साहेबांना नियोजित ईशारा देवुन श्री. चाटे, साहेब सापळा अधिकारी यांना बोलावून घेतले. त्यांनतर निखाडे मॅडम यांचे पती श्री. हेमराज

2

**Form : 1-C**

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे : त्वरीत.

**No.** 0025014

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) : —

10. *Total value of properties stolen/involved :
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report/U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल/ यु. डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ):
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) :- प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमूद घटना ता. वडी व हिंगणी यातील आरोपी क्र. १ यांनी शिवारातील काही पद्धतीने घेतलेले काम पूर्ण करून ४,६४,९२३/- रु. चे बिल काढून दिल्याचा मोबदला म्हणून २ रक्कमेचे १३,५००/- रु.ची मागणी केली. तडजोडीअंती तीन रक्कमेचे ९,०००/- रु. लाचेची मागणी करुन प्रत्यक्ष सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र. २ यांचे मार्फतीने ९,०००/- रु. लाच रक्कम स्विकारल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन वर नमूद कलमान्वये गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed*.......... Rank.......... to take up the investigation/ Refused investigation/transferred to P. S.......... on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले महेश चाटे, पदनाम पोलीस उपअधिक्षक यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर लाप्रवि. भंडारा पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.
F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

(रजिश निकोडे)

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

Signature of the Officer-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : प्रमोद विश्वनाथ बागडे
नाव

*Rank : पो. ना. No. ८६३
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : दि. ०६/१२/२०१९.
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

निखाडे यांचे फुलपॅन्टच्या समोरील डावे बाजुच्या खिशातुन लाच रक्कम पंच श्री. मगर याचे हस्ते ताब्यांत घेवुन निळया लाईटने तपासनी केली आणि पंचनाम्याप्रमाणे नोटाच्या क्रमाकांची जुळनी करून त्याच नोटा असल्याची खात्री केली. लाच रक्कम ९०००/—रूपये हेमराज निखाडे यांचे ताब्यातुन त्याच ठिकाणी दोन्ही पंचासमक्ष जप्त केली.

सौ. ज्योती हेमराज निखाडे नगराध्यक्ष नगर पंचायत लाखनी यांनी, "कंत्राटी पध्दतीने **घेतलेले काम पुर्ण करून ४,६४,९२३/— रूपयाचे बिल काढुण दिल्याचा मोबदला म्हणुन दोन टक्क्याप्रमाणे ९०००/—रूपये लाचेची मागणी करून त्यांचे पती श्री. हेमराज निखाडे यांचे मार्फतीने** आज रोजी माझेकडुन स्विकारली. सौ. ज्योती निखाडे, नगराध्यक्ष नगर पंचायत लाखनी व श्री. हेमराज निखाडे यांचे विरूध्द कार्यवाहीस्तव मी फिर्याद देत आहे.

माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे बरोबर संगणकावर टंकलिखीत करण्यात आली आहे. त्याची प्रिंट काढुन, मी वाचून पाहीली, बरोबर असल्याची खात्री केली. त्यावर मी सही केली.

(राजेश निखाडे)